**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३८६/२०१७ मधील नि.क्र.१२७ खाली आदेश</u>**

**<u>(रविंद्र केपवाडे वि. सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका वगैरे)</u>**

**<u>(CNR No.MHSN02-0014782017)</u>**

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई व उद्घोषणा होऊन मिळणेकरिता दाखल केला असुन तो प्रतिवादी यांच्या पुढील पुराव्याकरिता प्रलंबीत आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांनी निशाणी क्र. १२० कडे त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ ते ४ यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे दिनांक १२/०२/२०२६ रोजी त्यांच्याविरुध्द विरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. परंतू, प्रस्तुत अर्जातील कथन तसेच दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता तसेच प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचे हितसंबंध गुंतले असल्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींना यांना उलटतपास घेण्याची संधी देवुन प्रकरण गुणदोषावर चालविणे न्यायोचित होईल, जेणेकरुन वादी व प्रतिवादींमधील सर्व वादप्रश्न कायदेशीर गुंतागुंत न वाढविता प्रकरण निकाली काढण्यास न्यायालयास मदत होईल. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: **<u>आदेश</u>** ::

अर्ज (निशाणी १२७) मंजूर करण्यात येतो.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.03.05 11:39:12 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. ०४/०३/२०२६ सह.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.